<u>आरोप निश्चित करण्यापुर्वीचा पुरावा</u>

**नियमित.फौ.ख क: ९२/२०१४**
**राज्य वि सत्यनारायण व इतर**
**<u>नि क. १४</u>**

सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३ शपथेवर निवेदन करतो की,
**माझे नांव** : मोरेश्वर नारायण फुसारे
**वय** : ४९ वर्षे, व्यवसाय: वनमजुर
**राहणार** : रामटेक , तह. रामटेक

**<u>सरकारतर्फे सरतपास श्रीमती व्ही. पी. थोटे, सहायक सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत</u>**

दि. २६.०९.२०१२ रोजी मला वन अधिकारी काशीकर, नागरगोजे, वनरक्षक झोटींग, वनरक्षक राउत यांनी मला मौजे अजनी येथे जायचे आहे म्हणुन पंच म्हणुन हजर राहण्यासाठी बोलाविले होते. काशीकर यांनी आरोपीचा शोध घ्यायचा आहे असे मला सांगितले. परिसरात त्यांनी पाहणी केली. त्यानंतर एक आरोपी मिळाला. त्याचे नाव लिल्हारे होते. मला नक्की त्याचे नाव आठवत नाही. श्री काशीकर यांनी माझेसमक्ष मौका पंचनामा तयार केला. मौका पंचनामा मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, श्री काशीकर, वनअधिकारी पी.पी. वाघे, श्री राउत व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर मला माहित आहे. त्यास नि क्र. १५ देण्यात येत आहे. त्याच दिवशी आम्ही परत अजनी गावात गेलो. वनअधिका-यांनी पुन्हा दुस-या आरोपीचा शोध घ्यायचा आहे असे सांगितले. आम्ही शोध घेतला परंतु दुसरा आरोपी मिळुन आला नाही. आरोपीचा शोध घेतल्याबाबतचा पंचनामा मला दाखविण्यात आला. त्यावर माझी, श्री काशीकर, वनरक्षक राउत, आरोपीची सही आहे. त्यावर अमृत पटलेची यांची सुध्दा सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि क्र. १६ देण्यात येत आहे.

आरोपीने सांगितल्याप्रमाणे वनअधिका-यांनी शेताची पाहणी केली असता धु-यावर ३ वीळे, एक सत्तार, दोन

सु–या, एक खुरपणी मिळुन आले. आता मला अवजारे मिळाल्याबाबतचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर वनपरिक्षेत्र अधिकारी श्री वाघे, राउंड ऑफिसर श्री काशीकर, वनरक्षक राउत व दोन आरोपीची सही आहे. साक्षीदार आता सांगतो की एका आरोपीचा निशाणी आंगठा व माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि क्र.१७ देण्यात येत आहे. जप्त मालाची यादी मला दाखविण्यात आली त्यावर माझी, वनरक्षक राउत, दोन आरोपीच्या व अमृत पटलेची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि क्र.१८ देण्यात येत आहे.

२७ तारखेला परत वनअधिका–यांसोबत मी अजनी गावात गेलो. हरणाच्या शिकारीचे आरोपी फरार असल्याने त्यांचा शोध घ ेण्यासाठी अजनी गावात गेलो. आरोपीचा शोध घेतला तो घरी मिळुन आला नाही. म्हणुन त्या ठिकाणी वन अधिका–यांनी पंचनामा तयार केला. सदर पंचनामा मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. तसेच एका आरोपीची सही व एका आरोपीचा निशाणी आंगठा आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि क्र. १९ देण्यात येत आहे. आज न्यायालयात आरोपी हजर आहेत. त्यांना नावानिशी मी ओळखत नाही.

**सरतपास पुर्ण :**

**उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ करिता श्री ए.व्ही. गजभिये यांनी उलटतपास राखुन ठेवला.**

**उलटतपास आरोपी क्र. ४ ते ७ करिता श्री जी आर मेश्राम यांनी उलटतपास राखुन ठेवला.**

| श्रवणोत्तर स्वीकृती | समक्ष |
|---|---|
| (म.सु. बनचरे) | (म.सु. बनचरे) |
| न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक | न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,रामटेक. |
| दिनांक १६.०४.२०१८. | दिनांक १६.०४.२०१८. |